अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता . पारनेर, जि . अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.) G-I

## विषय :- हडप्पा संस्कृती

# हडप्पा संस्कृती

**हडप्पा संस्कृती** (इंग्रजी: Harappan civilization) ही जगातील प्राचीन ताम्र युगीन संस्कृतींपैकी एक आहे. हिचा कालखंड लिबी यांच्या कार्बन १४ या शास्त्रीय पद्धतीनुसार इ.स.पू. २७०० ते इ.स.पूर्व १५०० असा मानला जातो. इ.स. १९२० च्या सुमारास लाहोर-मुलतान रेल्वे मार्गाचे काम सुरू असताना काही प्राचीन विटांचे अवशेष सापडले. यामुळे पुरातत्त्व खात्याने याचा शोध घेण्यासाठी सर जॉन मार्शल यांच्या नेतृत्वाखाली उत्खनन सुरू केले आणि एक प्राचीन संस्कृती प्रकाशात आली. या संस्कृतीचे प्रथम अवशेष हडप्पा येथे सापडले म्हणून नव्यानेच शोधलेल्या या संस्कृतीला *हडप्पा संस्कृती* असे म्हणतात. ही संस्कृती प्रामुख्याने सिंधू नदीच्या प्रदेशात केंद्रित असल्याने तिला 'सिंधू संस्कृती' असेही म्हणतात.

उत्खननात हडप्पा व मोहेंजोदडो या दोन्ही नगरांच्या ठिकाणी एकाच प्रकारच्या मुद्रा आढळून आल्या. अशाच प्रकारच्या संस्कृतीचे अवशेष पश्चिम भारतात कालीबंगन, धोळावीरा, सुरकोटडा, लोथल, दायमाबाद इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात सापडले.

# नगररचना

हडप्पा संस्कृतीची नगररचना व स्थापत्य अत्यंत प्रगत होते. घरे, तटबंदी, सांडपाण्याची व्यवस्था, स्नानगृहे, धान्याची कोठारे, जहाजाची गोदी इत्यादी घटक पाहता हडप्पाकालीन संस्कृतीच्या प्रगत स्थापत्याची कल्पना येते. प्राचीन इजिप्त व मेसोपोटेमिया या समकालीन संस्कृतींच्या अगदी विरुद्ध हडप्पामध्ये कोणतीही भव्य मंदिरे किंवा तत्सम बांधकामे नव्हती.

हडप्पाकालीन नगराची विभागणी प्रशासकीय इमारती व लोकवस्ती अशा दोन घटकांत करण्यात आलेली होती. शहराच्या लोकवस्तीचा भाग बुद्धिबळाच्या पटाप्रमाणे किंवा जाळीप्रमाणे विविध प्रभागांमध्ये विभागला होता. नगर बांधणीसाठीच्या विटा ४:२:१(लांबी:रुंदी:उंची) या प्रमाणातच असत.

# घरे

हडप्पा संस्कृतीत प्रत्येक प्रभागात २० ते ३० घरे असत. ती पक्क्या विटांची असून प्रशस्त होती. प्रत्येक घरामध्ये स्नानगृह(बाथरूम) असे. काही घरांच्या परसात विहिरी आढळल्या आहेत. घरांच्या मध्यभागी, जसे आजही वाड्यांच्या व इतर भारतातील पारंपरिक घरांमध्ये असते, तसे.अंगण असे. [२] घरे एक किंवा दोन मजली असत. फारच क्वचित याहून अधिक मजले असत.

## तटबंदी

हडप्पाकालीन नगरांना संरक्षक तटबंदी असे. तटबंदी रुंद असून तिचे बांधकाम पक्क्या विटांचे असे. तटबंदीला बुरूज होते. यावरून हडप्पा संस्कृतीने नगराच्या संरक्षणाकडे लक्ष दिल्याचे दिसते.

## रस्ते

शहराच्या प्रभागाकडून जाणारे रस्ते मुख्य रस्त्यांना जोडलेले असत. रस्ते पुरेसे रुंद असून ते एकमेकांना काटकोनांत छेदणारे होते. रस्त्यांच्या कडेला सापडलेल्या लाकडांच्या अवशेषांवरून रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय असावी असे दिसते.

# सांडपाण्याची व्यवस्था

हडप्पा संस्कृतीत सांडपाणी व पावसाचे पाणी गावाबाहेर वाहून नेण्यासाठी एक मीटर खोल भुयारी गटारांची व्यवस्था होती. ही गटारे दगड व पक्क्या विटांनी बांधलेली होती. कोणत्याही समकालीन संस्कृतीमध्ये न आढळणारी सांडपाण्याची व्यवस्था हडप्पा संस्कृतीत पाहावयास मिळते.

# महास्नानगृह व जहाजाची गोदी

मोहनजोदडो येथे उत्खननात सापडलेले महास्नानगृह
हडप्पा संस्कृतीत सार्वजनिक स्नानगृहे होती. मोहनजोदडो येथे एका भव्य स्नानगृहाचे अवशेष सापडले. या स्नानगृहाची लांबी १२ मीटर, रुंदी ७ मीटर आणि खोली २.५ मीटर आहे. याच्या बाहेरच्या भिंती ७ ते ८ फूट रुंदीच्या असून कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था होती. स्नानगृहाचे वापरलेले पाणी बाहेर सोडण्याची व शुद्ध पाणी आत आणण्याची व्यवस्था केलेली होती. यावरून हडप्पा संस्कृतीतील लोक आरोग्याबाबत किती दक्ष होते हे दिसून येते.
लोथल येथील उत्खननामध्ये एका प्रचंड गोदीचे अवशेष सापडले. या गोदीची लांबी २७० मीटर तर रुंदी ३७ मीटर आहे. या गोदीवरून जहाजबांधणी, व्यापार, व्यापारीमार्ग यांची माहिती या संस्कृतीमधील लोकांना होती असे दिसून येते. येथे सापडलेल्या एका मुद्रेवर जहाजाचे चित्र कोरले आहे. तसेच लोथल येथे पक्क्या विटांनी बांधलेली धान्य कोठारे सापडली आहेत. यावरून कृषी व व्यापार क्षेत्रातील त्यांची प्रगती लक्षात येते.

# समाजरचना

हडप्पा संस्कृतीत कुटुंबसंस्था महत्त्वाची होती. नगररचनेच्या अवशेषांवरून समाजात राज्यकर्त्यांचा वर्ग, व्यापारी वर्ग व सर्वसामान्यांचा वर्ग असल्याचे दिसते. नद्यांच्या काठी सुपीक प्रदेशात ही संस्कृती विकसित झालेली असल्याने शेती हा समाज जीवनाचा कणा होता.

# वेशभूषा-केशभूषा

हडप्पा संस्कृतीमधील मातीच्या भांड्यांवर मिळालेले कापडाचे ठसे, मृण्मयमूर्तीवर दाखवलेले वस्त्र, उत्खननात मिळालेल्या विविध आकारांच्या सुया यावरून लोकांना वेशभूषेचे चांगले ज्ञान असल्याचे दिसते. तसेच तत्कालीन मूर्तींवरून केशभूषेची माहिती मिळते. पुरुष दाढी कोरत, मधोमध भांग पाडत तर स्त्रिया विविध प्रकारची केशरचना करत असत.

# सौंदर्यप्रसाधने

हडप्पाकालीन संस्कृतीच्या उत्खननात एक शृंगारपेटी मिळाली. यामध्ये काशाचे आरसे, हस्तिदंती कंगवे, केसासाठी आकडे, पिना, ओठ व भुवया रंगवण्यासाठी लागणाऱ्या विविध रंगाच्या कांड्या मिळाल्या. हडप्पाकालीन लोकांना सौंदर्यप्रसाधनांप्रमाणेच अलंकाराची आवड होती. उत्खननामध्ये मण्यांचे व सोन्याचे हार, बांगड्या, अंगठ्या, वाक्या, कमरपट्टा इत्यादी अलंकार मिळाले तसेच नर्तकीचा ब्रॉंझचा पुतळा मिळाला. तिच्याही हातात बांगड्या व गळ्यात हार आहे.

# करमणुकीची साधने

हडप्पाकालीन लोकांची सोंगट्या, फासे ही करमणुकीची साधने होती. नृत्य, गायन, शिकार व प्राण्यांच्या झुंजी इत्यादींमधून करमणूक केली जाई. लहान मुलांसाठी भाजक्या मातीची सुबक खेळणी बनवली जात. डोक्याची पुढेमागे हालचाल करू शकणारा बैल, बैलगाडी, पक्ष्यांच्या अ◌ाकाराच्या शिट्या, खुळखुळे इत्यादींचा यात समावेश होतो.

# धर्मकल्पना

हडप्पा संस्कृतीत उत्खननात सापडलेल्या विविध मुद्रा, मूर्ती, अग्निकुंड, मृतांना पुरण्याची पद्धत यावरून त्यांच्या धार्मिक कल्पनेची माहिती मिळते. लोकांची प्रामुख्याने शेतीवरती उपजीविका असल्याने लोक भूमातेस मातृदेवता मानत. त्यांच्या धार्मिक जीवनात निसर्गशक्तीस महत्त्वाचे स्थान होते. सूर्य, जल, अग्नी, वृक्ष यांची ते पूजा करत. कालिबंगन येथे सापडलेल्या अग्निकुंडावरून ते अग्निपूजा करत असल्याचे दिसते. निसर्गदेवतेप्रमाणेच पशुपती, नाग, वृषभ म्हणजे बैल यांचीही ते पूजा करत होते. लोक मूर्तिपूजक होते, मात्र हडप्पा संस्कृतीत मंदिरे आढळली नाहीत.

तेथील लोक मृतदेहाचे विधिपूर्वक दफन करत. दफन करते वेळी त्यांचे सोबत अलंकार व भांडी ठेवली जात.

अंतविधी संस्कार:पूर्णसमाधी,आंशिकसमाधी,दाहकर्म.

# आहार

तेथील लोकांचा प्रमुख आहार गहू होता. त्याचबरोबर जव, तीळ, वाटाणा, यासारखी दुय्यम धान्ये सुद्धा पिकवीत असत. खजुराचा उपयोगही ते अन्न म्हणून करीत असत. येथील लोक पशू बाळगीत त्यामुळे दूधदुभत्यांचा पुरवठा त्यांच्याकडे होत असावा. तसेच मांसाहारही केला जात असे.

# खेळणी

मुलांच्या खेळण्यात हत्ती, निरनिराळे प्राणी, तसेच चाकांच्या मातीच्या गाड्या इत्यादी आढळून आल्या. त्यामुळे प्रत्यक्षात वाहतुकीला योग्य अशा गाड्या अस्तित्वात असाव्यात असा तर्क केला जातो.

# वजन आणि मापे

येथील लोक अनेक प्रकारच्या वजनांचा उपयोग करीत. त्यांत दोराने उचलण्याच्या वजनापासून ते सोनाराने उपयोगात आणलेल्या लहानशा वजनापर्यंतचा समावेश होता.
वजन माप हे 16 च्या पटितील होते. 0.8565 हे वजन कमीत कमी होते व 274.938 हे जास्तीत जास्त होते.

# घरगुती उपकरणे

कुंभाराच्या चाकावर बनवलेली सुंदर मातीची भांडी येथे आढळली. त्यांवर नक्षीकाम केलेले होते. याशिवाय तांबे, ब्रांझ आणि चांदीची भांडी सापडली, परंतु याचे प्रमाण मात्र अत्यल्प होते.

# हडप्पा संस्कृतीचा विनाश

या संस्कृतीच्या विनाशाची अनेक कारणे सांगितली जातात.

१) नैसर्गिक संकटामुळे -

नदीला आलेला पूर/अतिवृष्टी

भूकंप

हवामानात होणारा बदल

जमिनीची सुपिकता घटली

थर वाळवंट विस्तारल्याने सरस्वती नदी लुप्त होणे

२) बाह्य आक्रमणे -

आर्यांचे आक्रमण

युयुत्सु लोकांचे आक्रमण

३) तंत्रज्ञानावरील मक्तेदारी संपली.

४) राजकीय विघटनामुळे नाश

५) आर्थिक विघटनामुळे नाश

६) कायदा व सुव्यवस्था नसावी.

# अलीकडील संशोधन

पुणे डेक्कन कॉलेज, खरगपूर येथील इंडियन इन्स्टिटय़ुट ऑफ टेक्नॉलॉजी व इतर संस्थांनी २०१६ साली केलेल्या एका नव्या संशोधनातून प्राचीन सिंधू संस्कृती ही ५५०० वर्षांपूर्वीची नसून ८००० वर्षांपूर्वीची असल्याचे निष्कर्ष काढले गेले आहेत.‘नेचर’ या विज्ञानसंशोधनविषयक नियतकालिकाच्या एप्रिल २०१६ च्या अंकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. २०१४ मध्ये तामिळनाडुतील शिवगंगा जिल्ह्यातील पल्लीसंथाई थिडल या गावात जमिनीखाली गाडले गेलेले हडप्पा संस्कृतीसारखे अवशेष आढळून आले आहेत. बंगळूरू येथील पुरात्तव विभागाच्या संशोधकांनी याचा शोध लावला आहे

# हडप्पा संस्कृतीकालीन शिल्पकला



मोहनजोदडो येथे उत्खननात सापडलेले महास्नानगृह



अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)

## विषय :- प्राचीन भारतीय इतिहासाची वाङ्मयीन साधने

# प्राचीन भारतीय इतिहासाची
# वाङ्मयीन साधने

## अ) हिंदू वाङ्मय :

### १) चार वेद :

i) ऋग्वेद : ऋग्वेद हा जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. इ.स.पू. १५०० च्या सुमारास या ग्रंथाची निर्मिती झालेली दिसून येते. या ग्रंथनिर्मिती मध्ये कालानुरूप अनेक ऋषीमुनींनी हातभार लावलेला दिसून येतो. या ग्रंथात १० मंडल, १०२८ सुक्त आणि १०५५२ ऋचा आहेत. या ग्रंथाद्वारे आर्यांच्या धार्मिक श्रद्धा, जीवनपद्धती, संस्कृती, धर्म इ.विषयक माहिती मिळते.

ii) यजुर्वेद : यजुर्वेद हा यज्ञवेद आहे. त्याचे दोन भाग पडतात कृष्ण यजुर्वेद आणि शुक्ल यजुर्वेद. कृष्ण यजुर्वेदात यज्ञाची जागा, यज्ञकुंड त्याची लांबी-रूंदी, यज्ञासाठी लागणारे साहित्य तर शुक्ल यजुर्वेदात मंत्र-श्लोक आणि यज्ञाच्या प्रसंगी म्हटल्या जाणा-या वाक्यांचा सामावेस असे. याद्वारे तत्कालीन भौगोलिक विस्तार, समाजजीवन व धार्मिक जीवन यांविषयीची माहीती मिळते.

iii) सामवेद : सामन् म्हणजे गाणे होय. यज्ञाच्यावेळी गावयाच्या ऋचांचा संग्रह सामवेदात आहे. या वेदात १५४९ ऋचा आहेत त्यापैकी मुळच्या ७५ ऋचा आहेत बाकीच्या सर्व ऋग्वेदातीलच आहेत. याद्वारे प्राचीन काळातैल संगिताची माहीती होते.

iv) अथर्ववेद : या ग्रंथातीलही अनेक ऋचा ऋग्वेदातीलच आहेत. या ग्रंथाद्वारे शत्रूद्वेष, सुखलालसा, जादूटोणा, अंधश्रद्धा तसेच आयुर्वेदाविषयीची माहीती मिळते.

## २) वेदांगे :

१. शिक्षा　　२. कल्प　　३. व्याकरण

४. छंद　　५. निरूक्त　　६. ज्योतिष

## ३) सुत्रे :

१. गुहयसुत्र　　२. श्रौतसुत्र

३. धर्मसुत्र　　४.

## ४) ब्राम्हणे :

ब्राम्हणे हे ग्रंथ वेदांची परिशिष्टे आहेत. वैदिक धर्माचे प्राबल्य वाढत गेल्याने वेदांमधील ऋचा, सुक्ते ही सामान्य लोकांना समजेल अशा पद्धतीने रचली त्यास 'ब्राम्हणे' असे म्हणतात.

५) आरण्यके: हादेखील वेदांचाच भाग आहे. वानप्रस्थाश्रमात असताना यज्ञविधिचे पालन करताना तेथे ज्या साहित्याची निर्मिती झाली त्यास 'आरण्यके' असे म्हणतात. याद्वारे वेदांतील मूळ तत्त्वज्ञान समजावून घेण्यास मदत होते.

६) उपनिषदे : गुरूंच्या सानिध्यात बसून शिक्षण घेताना जी साहित्यनिर्मिती झाली त्यास उपनिषदे असे म्हणतात. या उपनिषदांद्वारे तत्त्वज्ञानाची माहीती मिळते.

७) पुराणे: हिंदू धर्मात १८ पुराणे आहेत. यामध्ये वायुपुराण, विष्णुपुराण, मत्स्यपुराण इ. ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

८) महाकाव्य: रामायण व महाभारत ही महाकाव्ये देखील प्राचीन भारताचा इतिहास जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरतात.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.) G-II

## विषय :- होमरुल चळवळ

# होमरुल चळवळ

**होमरुल चळवळ** ही ब्रिटनमध्ये आयरिश गृह राज्य चळवळ व इतर चळवळीच्या शोधांसाठी एक चळवळ होती. त्यावेळी आयर्लंडमध्ये होमरुल चळवळ जोरात चालली होती, मग अशा प्रकारची चळवळ भारतात का होऊ नये अशी कल्पना १९१५ साली डॉ.ॲनी बेझंट यांनी मांडली. पहिली होमरूल चळवळ टिळकांनी बेळगाव येथे स्थापन केली, तर त्याच वर्षी (१९१६) अड्यार (मद्रास) येथे डॉ.ॲनी बेझंट यांनी त्यांची लीग स्थापन केली. १९१६ ते १९१८ पर्यंत सुमारे दोन वर्ष ही चळवळ सुरू राहिली. टिळकांकडे मुंबई सोडून महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रांत आणि वऱ्हाड होते. होमरूल चळवळीसाठी उर्वरित भारत हा

डॉ.ॲनी बेझंट यांच्याकडे सोपवण्यात आला होता.

# पार्श्वभूमी

भारतीय लोकशाही आंदोलनाची सुरुवात पहिल्या महायुद्धपासून झाली. महायुद्धामध्ये भारताने ब्रिटन ला खूप मदत केली होती, त्याबदल्यात स्वशासन मिळावे अशी अपेक्षा केली होती. तेव्हा ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांना सहकार्य करतानाच होमरूल लीगच्या माध्यमातून भारतीयांना जागृत करून स्वशासन मिळवणे आवश्यक वाटले.१९१५ पर्यंत अनेक घटकांनी चळवळीचे एका नवीन टप्प्याचे स्थान निश्चित केले. डॉ.ॲनी बेझंट ह्या मुळचा आयरिश होत्या, तिकडे होमरुल चळवळ जोरात चाली होती मग अशा प्रकारची चळवळ भारतात का होऊ नये अशी कल्पना १९१५ साली डॉ.ॲनी बेझंट यांनी मांडली. विद्रोह आणि त्याच्या दडपशाहीमुळे ब्रिटीश राजवटीविरुद्ध संतप्त वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर १९१६ मध्ये लोकमान्य टिळक यांनी होमरूल चळवळची स्थापन केली.

# तयारी

१९१६ आणि १९१८ च्या दरम्यान जेव्हा युद्ध सुरु झाले, तेव्हा प्रमुख बडे भारतीय जोसेफ बप्टिस्टा, मुहम्मद अली जिन्ना, बाळ गंगाधर टिळक, जी.एस. खापर्डे, सर एस. सुब्रह्मन्यम अय्यर आणि थेओसोफिकल सोसायटीचे नेते, अ‍ॅनी बेझंट, यांनी राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेतला. संपूर्ण भारतातील चळवळीचा मुख्य हेतू हा होता कि, विशेषत: संपूर्ण भारतासाठी ब्रिटीश साम्राज्यात गृह नियम किंवा स्वराज्यची मागणी करणे. त्या वेळी या चळवळीने प्रचंड उत्साह निर्माण झाला होता आणि भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस आणि अखिल भारतीय मुस्लिम लीगच्या अनेक सदस्यांना आकर्षित केलेगेले होते. १९१६ च्या लखनौ संविधानापासून ते सहयोगी होते. मुस्लीम लीग आणि भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस यांच्यातील एकीकरण हे अ‍ॅनी बेझंट यांचे उल्लेखनीय यश होते.


# टिळक यांची होमरुल चळवळ

पहिली होमरूल चळवळ टिळकांनी बेळगाव येथे स्थापन केली. टिळकांकडे मुंबई सोडून महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रांत आणि वऱ्हाड होते. त्यांचा चळवळीचा मुख्य हेतु भारताला स्वतंत्र मिळवून देणे आणि शिक्षणाचा प्रसार करणे हा होता.

# ॲनी बेझंट यांची होमरुल चळवळ

ॲनी बेझंट यांनी सप्टेंबर १९१६ मद्रास मध्ये त्यांची होमरुल चळवळ स्थापन केली. मद्रास सोडून त्यांनी पूर्ण भारतभर त्यांचा शाखा उघडल्या, पूर्ण भारतमध्ये जवळजवळ २०० शाखा होत्या.

# होमरुल चळवळीचा झेंडा



अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.)

## विषय :- सविनय कायदेभंग चळवळ

# सविनय कायदेभंग चळवळ

**सविनय कायदेभंग चळवळ** ही भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक चळवळ असून तिची सुरुवात राष्ट्रीय सभेच्या आदेशाने १४ फेब्रुवारी १९३० रोजी झाली होती.

## सुरुवात

भारतीय स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या राष्ट्रसभेला पूर्ण स्वराज्य हवे होते, पण ब्रिटीश सरकार ते द्यायला तयार नव्हते. महात्मा गांधींनी तडजोड म्हणून संपूर्ण दारूबंदी, ५० टक्के शेतसारा माफी, मिठावरील कर रद्द, ५० टक्के लष्कर खर्चाची कपात, देशी मालाला संरक्षण, राजकीय कैद्यांची मुक्तता अशा एकूण अकरा मागण्या ब्रिटीश सरकारपुढे मांडल्या होत्या.

सरकारने महात्मा गांधींच्या या मागण्यांकडे दुर्लक्ष करून दडपशाही सुरू केली. त्यास प्रत्युत्तर म्हणून १४ फेब्रुवारी १९३० रोजी राष्ट्रसभेने महात्मा गांधींच्या नेत्वृत्वाखाली सविनय कायदेभंगाचा जनतेला आदेश दिला. मिठावर लादलेला कर महात्मा गांधींना मान्य नव्हता; त्यामुळे या कायदेभंगाची चळवळ मिठाचा सत्याग्रह करून करावी, अशी कल्पना त्यांना सुचली व मार्च १२ १९३० रोजी साबरमतीच्या आश्रमातून महात्मा गांधी मिठाच्या सत्याग्रहासाठी दांडीयात्रेला निघाले. एप्रिल ५, १९३० ला त्यांनी मिठाचा कायदा मोडला

# स्वरूप

मिठाचा सत्याग्रह
सरकारी शिक्षणसंस्थांवर बहिष्कार
परदेशी माल, दारू, अफू विकणार्या दुकांनांवर निदर्शने
परदेशी मालाची होळी
करबंदी
हे कायदेभंग चळवळीतील प्रमुख आदेश महात्मा गांधींनी जनतेला दिले होते. नेहरू रिपोर्ट लागू करण्यासाठी गाधीनी ब्रिटिशांना मुदत दिली.

# परिणाम

सविनय कायदेभंगाच्या चळवळीमुळे जनतेच्या देशभक्तीला मोठे उधाण आले. लोक सरकारी जागांचे राजीनामे देऊ लागले. तळागाळातील हजारो लोक सत्याग्रहात सामील झाले. सैन्यात राष्ट्रभक्ती वाढली. वायव्य सरहद्द प्रांतातही देशभक्तीचे वारे पसरले. या सर्वांचा परिणाम म्हणून ब्रिटीश सरकारने पंतप्रधान मॅक्डोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली लंडन येथे पहिली गोलमेज परिषद बोलावली.

# शेवट

गोलमेज परिषदेला गेलेल्या काही हिंदी पुढार्यांनी गोलमेज परिषदेहून आल्यावर महात्मा गांधींची भेट घेतली व मजूर पक्षांच्या मनात भारताच्या स्वातंत्र्याबद्दल सहानुभूती असल्याचे सांगितले व महात्मा गांधींनी व्हाईसरॉयची भेट घेऊन तडजोड करावी असे सुचविले. त्याप्रमाणे महात्मा गांधी व लॉर्ड आयर्विन यांच्यात फेब्रुवारी १९३१ मध्ये बैठक सुरू झाली आणि मार्च ५ १९३१ च्या बैठकीत दोघांमध्ये करार झाला तो करार गांधी-आयर्विन करार म्हणून प्रसिद्ध आहे. या करारानंतर सविनय कायदेभंगाची चळवळ समाप्त झाली.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.) G-I

## विषय :- हडप्पा संस्कृती

# हडप्पा संस्कृती

**हडप्पा संस्कृती** (इंग्रजी: Harappan civilization) ही जगातील प्राचीन ताम्र युगीन संस्कृतींपैकी एक आहे. हिचा कालखंड लिबी यांच्या कार्बन १४ या शास्त्रीय पद्धतीनुसार इ.स.पू. २७०० ते इ.स.पूर्व १५०० असा मानला जातो. इ.स. १९२० च्या सुमारास लाहोर-मुलतान रेल्वे मार्गाचे काम सुरू असताना काही प्राचीन विटांचे अवशेष सापडले. यामुळे पुरातत्त्व खात्याने याचा शोध घेण्यासाठी सर जॉन मार्शल यांच्या नेतृत्वाखाली उत्खनन सुरू केले आणि एक प्राचीन संस्कृती प्रकाशात आली. या संस्कृतीचे प्रथम अवशेष हडप्पा येथे सापडले म्हणून नव्यानेच शोधलेल्या या संस्कृतीला *हडप्पा संस्कृती* असे म्हणतात. ही संस्कृती प्रामुख्याने सिंधू नदीच्या प्रदेशात केंद्रित असल्याने तिला 'सिंधू संस्कृती' असेही म्हणतात.

उत्खननात हडप्पा व मोहेंजोदडो या दोन्ही नगरांच्या ठिकाणी एकाच प्रकारच्या मुद्रा आढळून आल्या. अशाच प्रकारच्या संस्कृतीचे अवशेष पश्चिम भारतात कालीबंगन, धोळावीरा, सुरकोटडा, लोथल, दायमाबाद इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात सापडले.

# नगररचना

हडप्पा संस्कृतीची नगररचना व स्थापत्य अत्यंत प्रगत होते. घरे, तटबंदी, सांडपाण्याची व्यवस्था, स्नानगृहे, धान्याची कोठारे, जहाजाची गोदी इत्यादी घटक पाहता हडप्पाकालीन संस्कृतीच्या प्रगत स्थापत्याची कल्पना येते. प्राचीन इजिप्त व मेसोपोटेमिया या समकालीन संस्कृतींच्या अगदी विरुद्ध हडप्पामध्ये कोणतीही भव्य मंदिरे किंवा तत्सम बांधकामे नव्हती.

हडप्पाकालीन नगराची विभागणी प्रशासकीय इमारती व लोकवस्ती अशा दोन घटकांत करण्यात आलेली होती. शहराच्या लोकवस्तीचा भाग बुद्धिबळाच्या पटाप्रमाणे किंवा जाळीप्रमाणे विविध प्रभागांमध्ये विभागला होता. नगर बांधणीसाठीच्या विटा ४:२:१(लांबी:रुंदी:उंची) या प्रमाणातच असत.

# घरे

हडप्पा संस्कृतीत प्रत्येक प्रभागात २० ते ३० घरे असत. ती पक्क्या विटांची असून प्रशस्त होती. प्रत्येक घरामध्ये स्नानगृह(बाथरूम) असे. काही घरांच्या परसात विहिरी आढळल्या आहेत. घरांच्या मध्यभागी, जसे आजही वाड्यांच्या व इतर भारतातील पारंपरिक घरांमध्ये असते, तसे.अंगण असे. [२] घरे एक किंवा दोन मजली असत. फारच क्वचित याहून अधिक मजले असत.

# तटबंदी

हडप्पाकालीन नगरांना संरक्षक तटबंदी असे. तटबंदी रुंद असून तिचे बांधकाम पक्क्या विटांचे असे. तटबंदीला बुरूज होते. यावरून हडप्पा संस्कृतीने नगराच्या संरक्षणाकडे लक्ष दिल्याचे दिसते.

# रस्ते

शहराच्या प्रभागाकडून जाणारे रस्ते मुख्य रस्त्यांना जोडलेले असत. रस्ते पुरेसे रुंद असून ते एकमेकांना काटकोनांत छेदणारे होते. रस्त्यांच्या कडेला सापडलेल्या लाकडांच्या अवशेषांवरून रस्त्यांवर दिवाबत्तीची सोय असावी असे दिसते.

# सांडपाण्याची व्यवस्था

हडप्पा संस्कृतीत सांडपाणी व पावसाचे पाणी गावाबाहेर वाहून नेण्यासाठी एक मीटर खोल भुयारी गटारांची व्यवस्था होती. ही गटारे दगड व पक्क्या विटांनी बांधलेली होती. कोणत्याही समकालीन संस्कृतीमध्ये न आढळणारी सांडपाण्याची व्यवस्था हडप्पा संस्कृतीत पाहावयास मिळते.

# महास्नानगृह व जहाजाची गोदी

मोहनजोदडो येथे उत्खननात सापडलेले महास्नानगृह
हडप्पा संस्कृतीत सार्वजनिक स्नानगृहे होती. मोहनजोदडो येथे एका भव्य स्नानगृहाचे अवशेष सापडले. या स्नानगृहाची लांबी १२ मीटर, रुंदी ७ मीटर आणि खोली २.५ मीटर आहे. याच्या बाहेरच्या भिंती ७ ते ८ फूट रुंदीच्या असून कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था होती. स्नानगृहाचे वापरलेले पाणी बाहेर सोडण्याची व शुद्ध पाणी आत आणण्याची व्यवस्था केलेली होती. यावरून हडप्पा संस्कृतीतील लोक आरोग्याबाबत किती दक्ष होते हे दिसून येते.

लोथल येथील उत्खननामध्ये एका प्रचंड गोदीचे अवशेष सापडले. या गोदीची लांबी २७० मीटर तर रुंदी ३७ मीटर आहे. या गोदीवरून जहाजबांधणी, व्यापार, व्यापारीमार्ग यांची माहिती या संस्कृतीमधील लोकांना होती असे दिसून येते. येथे सापडलेल्या एका मुद्रेवर जहाजाचे चित्र कोरले आहे. तसेच लोथल येथे पक्क्या विटांनी बांधलेली धान्य कोठारे सापडली आहेत. यावरून कृषी व व्यापार क्षेत्रातील त्यांची प्रगती लक्षात येते.

# समाजरचना

हडप्पा संस्कृतीत कुटुंबसंस्था महत्त्वाची होती. नगररचनेच्या अवशेषांवरून समाजात राज्यकर्त्यांचा वर्ग, व्यापारी वर्ग व सर्वसामान्यांचा वर्ग असल्याचे दिसते. नद्यांच्या काठी सुपीक प्रदेशात ही संस्कृती विकसित झालेली असल्याने शेती हा समाज जीवनाचा कणा होता.

# वेशभूषा-केशभूषा

हडप्पा संस्कृतीमधील मातीच्या भांड्यांवर मिळालेले कापडाचे ठसे, मृण्मयमूर्तींवर दाखवलेले वस्त्र, उत्खननात मिळालेल्या विविध आकारांच्या सुया यावरून लोकांना वेशभूषेचे चांगले ज्ञान असल्याचे दिसते. तसेच तत्कालीन मूर्तींवरून केशभूषेची माहिती मिळते. पुरुष दाढी कोरत, मधोमध भांग पाडत तर स्त्रिया विविध प्रकारची केशरचना करत असत.

# सौंदर्यप्रसाधने

हडप्पाकालीन संस्कृतीच्या उत्खननात एक शृंगारपेटी मिळाली. यामध्ये काशाचे आरसे, हस्तिदंती कंगवे, केसासाठी आकडे, पिना, ओठ व भुवया रंगवण्यासाठी लागणाऱ्या विविध रंगाच्या कांड्या मिळाल्या. हडप्पाकालीन लोकांना सौंदर्यप्रसाधनांप्रमाणेच अलंकाराची आवड होती. उत्खननामध्ये मण्यांचे व सोन्याचे हार, बांगड्या, अंगठ्या, वाक्या, कमरपट्टा इत्यादी अलंकार मिळाले तसेच नर्तकीचा ब्राँझचा पुतळा मिळाला. तिच्याही हातात बांगड्या व गळ्यात हार आहे.

# करमणुकीची साधने

हडप्पाकालीन लोकांची सोंगट्या, फासे ही करमणुकीची साधने होती. नृत्य, गायन, शिकार व प्राण्यांच्या झुंजी इत्यादींमधून करमणूक केली जाई. लहान मुलांसाठी भाजक्या मातीची सुबक खेळणी बनवली जात. डोक्याची पुढेमागे हालचाल करू शकणारा बैल, बैलगाडी, पक्ष्यांच्या अ◌ाकाराच्या शिट्या, खुळखुळे इत्यादींचा यात समावेश होतो.

# धर्मकल्पना

हडप्पा संस्कृतीत उत्खननात सापडलेल्या विविध मुद्रा, मूर्ती, अग्निकुंड, मृतांना पुरण्याची पद्धत यावरून त्यांच्या धार्मिक कल्पनेची माहिती मिळते. लोकांची प्रामुख्याने शेतीवरती उपजीविका असल्याने लोक भूमातेस मातृदेवता मानत. त्यांच्या धार्मिक जीवनात निसर्गशक्तीस महत्त्वाचे स्थान होते. सूर्य, जल, अग्नी, वृक्ष यांची ते पूजा करत. कालिबंगन येथे सापडलेल्या अग्निकुंडावरून ते अग्निपूजा करत असल्याचे दिसते.

निसर्गदेवतेप्रमाणेच पशुपती, नाग, वृषभ म्हणजे बैल यांचीही ते पूजा करत होते. लोक मूर्तिपूजक होते, मात्र हडप्पा संस्कृतीत मंदिरे आढळली नाहीत.

तेथील लोक मृतदेहाचे विधिपूर्वक दफन करत. दफन करते वेळी त्यांचे सोबत अलंकार व भांडी ठेवली जात.

अंतविधी संस्कार:पूर्णसमाधी,आंशिकसमाधी,दाहकर्म.

# आहार

तेथील लोकांचा प्रमुख आहार गहू होता. त्याचबरोबर जव, तीळ, वाटाणा, यासारखी दुय्यम धान्ये सुद्धा पिकवीत असत. खजुराचा उपयोगही ते अन्न म्हणून करीत असत. येथील लोक पशू बाळगीत त्यामुळे दूधदुभत्यांचा पुरवठा त्यांच्याकडे होत असावा. तसेच मांसाहारही केला जात असे.

# खेळणी

मुलांच्या खेळण्यात हत्ती, निरनिराळे प्राणी, तसेच चाकांच्या मातीच्या गाड्या इत्यादी आढळून आल्या. त्यामुळे प्रत्यक्षात वाहतुकीला योग्य अशा गाड्या अस्तित्वात असाव्यात असा तर्क केला जातो.

## वजन आणि मापे

येथील लोक अनेक प्रकारच्या वजनांचा उपयोग करीत. त्यांत दोराने उचलण्याच्या वजनापासून ते सोनाराने उपयोगात आणलेल्या लहानशा वजनापर्यंतचा समावेश होता.

वजन माप हे 16 च्या पटितील होते. 0.8565 हे वजन कमीत कमी होते व 274.938 हे जास्तीत जास्त होते.

## घरगुती उपकरणे

कुंभाराच्या चाकावर बनवलेली सुंदर मातीची भांडी येथे आढळली. त्यांवर नक्षीकाम केलेले होते. याशिवाय तांबे, ब्रांझ आणि चांदीची भांडी सापडली, परंतु याचे प्रमाण मात्र अत्यल्प होते.

# हडप्पा संस्कृतीचा विनाश

या संस्कृतीच्या विनाशाची अनेक कारणे सांगितली जातात.

१) नैसर्गिक संकटामुळे -

नदीला आलेला पूर/अतिवृष्टी

भूकंप

हवामानात होणारा बदल

जमिनीची सुपिकता घटली

थर वाळवंट विस्तारल्याने सरस्वती नदी लुप्त होणे

२) बाह्य आक्रमणे -

आर्यांचे आक्रमण

युयुत्सु लोकांचे आक्रमण

३) तंत्रज्ञानावरील मक्तेदारी संपली.

४) राजकीय विघटनामुळे नाश

५) आर्थिक विघटनामुळे नाश

६) कायदा व सुव्यवस्था नसावी.

# अलीकडील संशोधन

पुणे डेक्कन कॉलेज, खरगपूर येथील इंडियन इन्स्टिटय़ुट ऑफ टेक्नॉलॉजी व इतर संस्थांनी २०१६ साली केलेल्या एका नव्या संशोधनातून प्राचीन सिंधू संस्कृती ही ५५०० वर्षांपूर्वीची नसून ८००० वर्षांपूर्वीची असल्याचे निष्कर्ष काढले गेले आहेत.‘नेचर’ या विज्ञानसंशोधनविषयक नियतकालिकाच्या एप्रिल २०१६ च्या अंकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे. २०१४ मध्ये तामिळनाडुतील शिवगंगा जिल्ह्यातील पल्लीसंथाई थिडल या गावात जमिनीखाली गाडले गेलेले हडप्पा संस्कृतीसारखे अवशेष आढळून आले आहेत. बंगळूरू येथील पुरात्तव विभागाच्या संशोधकांनी याचा शोध लावला आहे

# हडप्पा संस्कृतीकालीन शिल्पकला



# मोहनजोदडो येथे उत्खननात सापडलेले महास्नानगृह



अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)

**विषय :-** प्राचीन भारतीय इतिहासाची वाङ्मयीन साधने

# प्राचीन भारतीय इतिहासाची
# वाङ्मयीन साधने

## अ) हिंदू वाङ्मय :

### १) चार वेद :

i) ऋग्वेद : ऋग्वेद हा जगातील सर्वात प्राचीन ग्रंथ आहे. इ.स.पू. १५०० च्या सुमारास या ग्रंथाची निर्मिती झालेली दिसून येते. या ग्रंथनिर्मिती मध्ये कालानुरूप अनेक ऋषीमुनींनी हातभार लावलेला दिसून येतो. या ग्रंथात १० मंडल, १०२८ सुक्त आणि १०५५२ ऋचा आहेत. या ग्रंथाद्वारे आर्यांच्या धार्मिक श्रद्धा, जीवनपद्धती, संस्कृती, धर्म इ.विषयक माहीती मिळते.

ii) यजुर्वेद : यजुर्वेद हा यज्ञवेद आाहे. त्याचे दोन भाग पडतात कृष्ण यजुर्वेद आणि शुक्ल यजुर्वेद. कृष्ण यजुर्वेदात यज्ञाची जागा, यज्ञकुंड त्याची लांबी-रूंदी, यज्ञासाठी लागणारे साहित्य तर शुक्ल यजुर्वेदात मंत्र-श्लोक आणि यज्ञाच्या प्रसंगी म्हटल्या जाणा-या वाक्यांचा सामावेस असे. याद्वारे तत्कालीन भौगोलिक विस्तार, समाजजीवन व धार्मिक जीवन यांविषयीची माहीती मिळते.

iii) सामवेद : सामन् म्हणजे गाणे होय. यज्ञाच्यावेळी गावयाच्या ऋचांचा संग्रह सामवेदात आहे. या वेदात १५४९ ऋचा आहेत त्यापैकी मुळच्या ७५ ऋचा आहेत बाकीच्या सर्व ऋग्वेदातीलच आहेत. याद्वारे प्राचीन काळातैल संगिताची माहीती होते.

iv) अथर्ववेद : या ग्रंथातीलही अनेक ऋचा ऋग्वेदातीलच आहेत. या ग्रंथाद्वारे शत्रूद्वेष, सुखलालसा, जादूटोणा, अंधश्रद्धा तसेच आयुर्वेदाविषयीची माहीती मिळते.

## २) वेदांगे :

१. शिक्षा  २. कल्प  ३. व्याकरण

४. छंद  ५. निरूक्त  ६. ज्योतिष

## ३) सुत्रे :

१. गुहयसुत्र  २. श्रौतसुत्र

३. धर्मसुत्र  ४.

## ४) ब्राम्हणे :

ब्राम्हणे हे ग्रंथ वेदांची परिशिष्टे आहेत. वैदिक धर्माचे प्राबल्य वाढत गेल्याने वेदांमधील ऋचा, सुक्ते ही सामान्य लोकांना समजेल अशा पद्धतीने रचली त्यास 'ब्राम्हणे' असे म्हणतात.

५) **आरण्यके:** हादेखील वेदांचाच भाग आहे. वानप्रस्थाश्रमात असताना यज्ञविधिचे पालन करताना तेथे ज्या साहित्याची निर्मिती झाली त्यास 'आरण्यके' असे म्हणतात.याद्वारे वेदांतील मूळ तत्त्वज्ञान समजावून घेण्यास मदत होते.

६) **उपनिषदे :** गुरूंच्या सानिध्यात बसून शिक्षण घेताना जी साहित्यनिर्मिती झाली त्यास उपनिषदे असे म्हणतात. या उपनिषदांद्वारे तत्त्वज्ञानाची माहीती मिळते.

७) **पुराणे:** हिंदू धर्मात १८ पुराणे आहेत. यामध्ये वायुपुराण, विष्णुपुराण, मत्स्यपुराण इ. ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

८) **महाकाव्य:** रामायण व महाभारत ही महाकाव्ये देखील प्राचीन भारताचा इतिहास जाणून घेण्यासाठी महत्त्वाचे साधन ठरतात.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.) S-II

## विषय :- **प्रार्थना समाज**

# प्रार्थना समाज

**प्रार्थना समाज** या संस्थेची स्थापना डॉ. आत्माराम पांडुरंग, दादोबा पांडुरंग व भास्कर पांडुरंग या तीन तर्खडकर बंधूंनी दिनांक ३१ मार्च, इ.स. १८६७ रोजी मुंबईत केली. 'सुबोध-पत्रिका' या नावाचे मुखपत्रही प्रार्थना समाजाने चालविले होते. पुण्यातही बुधवार पेठेत प्रार्थना समाजाची एक शाखा आहे. मुंबईतले प्रार्थना समाजाचे मुख्यालय गिरगावात वल्लभभाई पटेल रोड (जुने नाव सँडहर्स्ट रोड) आणि विठ्ठलभाई पटेल रोड यांनी बनलेल्या चौकाजवळ आहे.

# इतिहास

'प्रार्थना समाजाचा इतिहास' हा सुमारे सातशे पृष्ठांचा द्वा. गो. वैद्य यांनी यांनी शब्दबद्ध केलेला ग्रंथ, समाजाच्या हीरकमहोत्सवी वर्षांचे औचित्य साधून १९२७ मध्ये प्रकाशित झाला होता. आंतरजातीय विवाह, विधवा पुनर्विवाह, अल्पवयीन विवाहाला विरोध, हुंडा प्रथेला बंदी आणि अस्पृश्यता निवारण अशा विविध क्षेत्रांत देशाच्या पारतंत्र्याच्या काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात समाज प्रबोधन आणि समाज सुधारणेमध्ये मूलगामी स्वरूपाचे योगदान देणाऱ्या या संस्थेचा इतिहास, प्रार्थना समाजाच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षांचे औचित्य साधून नव्या स्वरूपात लिहिला जात आहे, त्यासाठी मुंबईची एशियाटिक सोसायटी योगदान देत आहे. पुणे विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. राजा दीक्षित यांनी 'प्रार्थना समाजाचा इतिहास' या ९० वर्षांपूर्वीच्या ग्रंथाच्या संपादनाची जबाबदारी स्वीकारली आहे.

दोन भागातील या मूळ ग्रंथामध्ये समाजाच्या इतिहासाचा ३१९ पृष्ठांमध्ये मागोवा घेण्यात आला होता. तर, दुसऱ्या भागात डॉ. पांडुरंग आत्माराम, मामा परमानंद, वासुदेव बाबाजी नवरंगे, बाळ मंगेश वागळे, वामन आबाजी मोडक, सदाशिव पांडुरंग पंडित, नारायण गणेश चंदावरकर आणि रामकृष्ण भांडारकर या धुरीण नेत्यांची चरित्रात्मक माहिती देण्यात आली होती.

# प्रार्थना समाजाचे सभासद असलेली मान्यवर व्यक्तिमत्त्वे

सरोजिनी कराडे
विकास काटदरे
ग.ल. चंदावरकर
न्यायमूर्ती नारायण गणेश चंदावरकर
मराठी व्याकरणकार दादोबा पांडुरंग तर्खडकर
वासुदेव बाबाजी नवरंगे
सदाशिव पांडुरंग पंडित
मामा परमानंद
अभय पारसनीस
प्राच्यविद्यापंडित सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर
वामन आबाजी मोडक
सिद्धार्थ राजाध्यक्ष
न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे
डॉ. सुनीलकुमार लवाटे
बाळ मंगेश वागळे

# स्तूप

सन १९२७मध्ये पुण्यातल्या प्रार्थना समाजाच्या आवारात, पुणे प्रार्थना समाजाचे अनेक वर्षे अध्यक्ष असलेले सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक दगडी स्तूप उभारण्यात आला. पुण्यातील ही वास्तू वैशिष्ट्यपूर्ण आहे.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.) S-II

## विषय :- **सत्यशोधक समाज**

# सत्यशोधक समाज

२४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी **सत्यशोधक समाजाची** स्थापना केली
पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून , गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. **`निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक, भांडणे अनेक कशासाठी'** हा विचार फुले यांनी मांडला. देवाविषयी किंवा निसर्गाविषयी **निर्मिक** हा शब्द वापरला, त्यावरुन सत्यशोधक समाज व अर्थातच महात्मा ज्योतीबा फुले आस्तिक होते, हे स्पष्ट होते.

'सार्वजनिक सत्यधर्म' हा सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो.

सत्यशोधक समाजातर्फे 'दीनबंधू' नावाचे एक साप्ताहिक मुखपत्र म्हणून चालविले जात असे.

'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ॥' हे या समाजाचे घोषवाक्य होते.

सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली.

सत्यशोधक समाजातर्फे पुरोहिताशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली.

त्यासाठी मराठीत मंगलाष्टके रचली.

समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - तृतीय वर्ष कला (T.Y.B.A.) S-III

: विषय :

**विश्वनाथ काशीनाथ राजवाडे**

# विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे जन्म नाव विश्वनाथ काशीनाथ राजवाडेजन्म १२ जुलै १८६३ वरसई, रायगड जिल्हामृत्यू ३१ डिसेंबर १९२६ धुळेभाषा मराठीसाहित्य प्रकार इतिहासप्रसिद्ध साहित्यकृती मराठ्यांच्या इतिहासाची साधने भारतीय विवाह संस्थेचा इतिहास *इतिहासाचार्य* **विश्वनाथ काशीनाथ राजवाडे** (जुलै १२, १८६३ - डिसेंबर ३१, १९२६) हे मराठी इतिहास-संशोधक होते. त्यांनी संपादित केलेले 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' ह्या ग्रंथाचे २२ खंड हे मराठा साम्राज्याच्या इतिहासाच्या अभ्यासासाठीचे महत्त्वाचे साधन मानले जाते.

# जीवन

राजवाड्यांचा जन्म जुलै १२, १८६३ रोजी महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील वरसई येथे झाला.

बी.ए. पर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर करून ते प्रकाशात आणण्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक सुरू केले हाते.

१८९८ साली त्यांनी लिहिलेल्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. जुलै ७, १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना त्यांच्या पुढाकाराने झाली.

डिसेंबर ३१, १९२६ रोजी राजवाड्यांचे निधन झाले.

राजवाडे म्हणायचे - ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्य लोक शिकतील; माझ्या ग्रंथांची पूजा करतील. मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीर्तीला हपापलेला नाही.

# राजवाड्यांचा दरारा

महाराष्ट्राच्या विचारविश्वात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचा मोठा दरारा, दबदबा आणि धाक होता. राजवाडे आपल्या हयातीतच एक आख्यायिका बनून गेले होते राजवाडे यांच्यावर भरपूर टीका झाली. त्यांच्या हयातीतच प्रबोधनकार के.सी. ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, जिवाजी मंगेश तेलंग यांनी त्यांना चांगलंच धारेवर धरले होते. नंतरही इतिहाससंशोधक त्र्यं.शं. शेजवलकर यांनी राजवाडे यांच्या मर्यादा स्पष्ट केल्या. तथापि, या सर्व गोष्टी एकत्र केल्या तरी राजवाडे यांचे वाक्य न् वाक्य ब्रह्मवाक्य मानणारा एक वर्ग अस्तित्वात राहिलाच आणि विशेष म्हणजे मराठी विचारविश्वात याच वर्गाचे वर्चस्व असल्यामुळे राजवाडे यांचे स्थान अबाधित राहिले.

# राजवाड्यांचे लेखन आणि प्रस्तावना

राजवाडे यांच्या नावावर स्वतंत्र असा एकही ग्रंथ नाही. त्यांनी नियतकालिकांमधून किरकोळ स्वरूपाचे लेख लिहिले. ‘महिकावतीची बखर’ आणि ‘राधामाधवविलास चंपू’ या प्राचीन ग्रंथांचं संपादन केले आणि मुख्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती तब्बल बावीस खंडांमध्ये छापली. त्यांच्यापैकी काही खंडांना प्रस्तावना लिहिल्या. राजवाडे संपादनांपेक्षा अधिक गाजले ते या प्रस्तावनांमुळे. ज्यांना या प्रस्तावना आवडल्या नाहीत, त्यांनाही राजवाडे यांनी अविश्रांत कष्ट घेऊन, प्रचंड भ्रमंती करून जमा केलेल्या इतिहासाच्या साधनसामग्रीसाठी त्यांच्या ऋणात राहण्यावाचून पर्यायच नव्हता. राजवाडे यांनी लिहिलेली ‘ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण’ या पुस्तकाची प्रस्तावना मूळ पुस्तकापेक्षा अधिक वाचनीय आहे. असेच त्यांच्या बहुतेक पुस्तकांबद्दल म्हणता येईल.

# प्रतिभाशक्ती आणि आत्मविश्वास

राजवाडे बुद्धिमान तर होतेच; पण त्यांना प्रतिभाशक्तीचीही देणगी लाभली होती. जबरदस्त आत्मविश्वास हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यामुळं साधा अंदाज किंवा कयाससुद्धा ते अशा पद्धतीने व अशा आक्रमकपणाने मांडत, की जणू काही तो त्रिकालाबाधित सत्य असलेला महासिद्धान्तच आहे.

# प्रकाशित साहित्य

भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड १ -मराठी भाषा व व्याकरण
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड २ -मराठी ग्रंथ व ग्रंथकार
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड ३ -संस्कृत भाषा विषयक
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड ४ -अभिलेख संशोधन
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड ५ -मराठी धातुकोष
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड ६ -व्युत्पत्ती कोष
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड ७,८ -समाजकारण व राजकारण
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड ९ - आत्मवृत्त व लेख
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड १० -प्रस्तावना खंड
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड ११ -इतिहास
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड १२ -संपादक राजवाडे
इतिहासाचार्य वि.का.राजवाडे समग्र साहित्य खंड १३ -समग्र संत साहित्य
खानदेशातील घराणी
तीर्थरूप शहाजीराजे भोसलें यांचे चरित्र
मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १ ते २२ (संपादन आणि प्रस्तावना)
राजवाडेनामादिशब्द व्युत्पत्तिकोश
राजवाडे लेखसंग्रह (संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी; साहित्य अकादमी प्रकाशन)
राधामाधवविलासचंपू (संपादन आणि प्रस्तावना)
संस्कृत प्रतिशब्दशः भाषांतर
संस्कृत भाषेचा उलगडा
ज्ञानेश्वर नीति कथा
ज्ञानेश्वरी (राजवाडे संहिता) : अध्याय १ (२३ पानी प्रस्तावनेसह), ४, १२
ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेचे व्याकरण

# संस्थात्मक कार्य

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे (संस्थापक)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे

# श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज

ता. पारनेर, जि. अहमदनगर

# इतिहास विभाग

वर्ग - तृतीय वर्ष कला (T.Y.B.A.) S-III

## विषय :- **इतिहास**

# इतिहास

**इतिहास** म्हणजे भूतकाळातील घटनांची नोंद व अभ्यास. इतिहास ह्या शब्दाची व्युत्पत्ती इतिहास = इति + ह +आस = हे असे घडले अशी सांगण्यात येते. व्युत्पत्तीद्वारे दिसून येणाऱ्या अर्थाचा विचार केला तर इतिहास म्हणजे केवळ भूतकाळात काय घडले ह्याची नोंद इतकाच अर्थ निघतो. परंतु ह्या शब्दाला इतर अर्थही कालौघात लगडलेले आढळतात. आधुनिक काळात केवळ पूर्ववृत्ताचे निवेदन इतकाच अर्थ ह्या संज्ञेला राहिला नसून ते निवेदन साधार, वास्तव असणेही त्यात गृहीत धरलेले असते. जो इतिहास विसरतो त्याला इतिहास विसरतो.

प्रसिद्ध इतिहासकार ई. एच. कार यांच्यामते भूतकाळ व वर्तमानकाळ यातील न संपणारा संवाद म्हणजे इतिहास होय. इतिहासाचे प्रकार खालीलप्रमाणे :

१) भूतकाळातील घटनाचे ज्ञान करून देणारे शास्त्र

२) इतिहासाची शास्त्रीय पद्धत

३) इतिहास आणि आपण

४) भूतकाळ आणि भविष्यकाळ

इतिहास म्हणजे मानवजातीच्या जीवनप्रवाहाचा अभ्यास असेही म्हणता येते. इतिहासाचे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक असे कालखंड असू शकतात. इतिहासाच्या कोणत्याही कालखंडाचा अभ्यास म्हणजे त्या कालखंडाच्या राजकीय, सामाजिक, आíथक, प्रशासकीय, सांस्कृतिक, धार्मिक बाजूंचा अभ्यास असतो. या शिवाय या सर्वांचा एकमेकांशी असलेला संबंध आणि परिणाम यांचा अभ्यास याचाही अंतर्भाव इतिहासात होतो. इतिहास या विषयाचे आकलन करून घेताना प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाच्या इतर घटकांची आवश्यक किमान माहिती व संस्कृतीचा सखोल अभ्यास असा दृष्टिकोन असावा लागतो.इतिहासातून माणूस नक्कीच काहीतरी शिकू शकतो.